दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● सोमवार २२ जूले २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३४० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक
मो.न.9422660077

# ना फडणवीस ना अजित दादा,शिंदेही नाही विधानसभेला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण?

**मुंबई प्रतिनिधी**



राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २२ जुलै रोजी वाढदिवस आहे. मात्र, पिंपरी-चिंचवडमधील कार्यकर्त्यांनी आणलेला एक अनोखा केक कापून अजित पवार यांनी आपला वाढदिवस साजरा केला. "मी अजित आशा अनंतराव पवार, महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतो की…", असे या केकवर लिहिले होते. अजितदादा यांना हा केक पाहून मनोमन आनंद झाला. मात्र, अजितदादा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील का? हा प्रश्न आहेच. कारण, महायुतीच्या तिन्ही पक्षांना आपल्याच पक्षाचा नेता मुख्यमंत्री व्हावा असे वावत आहे. मात्र, विधानसभा निवडणुकीनंतर मुख्यमंत्री कोण असेल याचा निर्णय दिल्ली हायकमांड घेणार आहे. त्याचप्रमाणे विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण असेल याची माहिती भाजपच्या वरिष्ठ नेत्याने दिली. विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपने जास्त जागा जिंकल्या तर भाजप मुख्यमंत्री पदावर दावा करेल असे भाजप नेत्याने स्पष्ट केले. तर, दुसरीकडे शिवसेनेतील बंडखोरीनंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार स्थापन झाले. त्यामुळे शिवसेनेने कितीही जागा जिंकल्या तरी शिंदे हेच मुख्यमंत्री असतील, असे शिवसेनेने म्हटले आहे. विधानसभेच्या २८८ जागांपैकी शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी ( अजितदादा) या दोन्ही पक्षांनी प्रत्येकी १०० जागांवर दावा सांगितला आहे. मात्र, हे दोन्ही पक्ष प्रत्येकी ८०-८० तडजोड करतील. तर, भाजप १६० जागा लढविणार आहे. याबाबतचा अंतिम निर्णय नवी दिल्लीत अमित शाह यांच्या उपस्थितीत घेण्यात येणार आहे असेही या भाजप नेत्याने सांगितले. भाजप नेत्याने दिलेल्या माहितीनुसार, 'मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या राज्यात नुकत्याच विधानसभा निवडणुक झाल्या. त्यावेळी भाजपने कोणत्याही नेत्याला भावी मुख्यमंत्री म्हणून प्रोजेक्ट केले नाही. हीच प्रक्रिया महाराष्ट्रात स्वीकारण्यात येण्याची शक्यता आहे. बराच विचारविनिमय केल्यानंतर महायुतीच्या एकाही नेत्याला म्हणजेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असणार नाही, असा निर्णय घेतला आहे असे या नेत्याने सांगितले. विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर नव्या मुख्यमंत्र्यांबाबत निर्णय घेतला जाईल. जागावाटपाच्या फॉर्म्युल्याबाबत पक्ष किमान १६० जागांवर दावा करणार आहे. चर्चेदरम्यान या संख्येवर आम्ही भर देऊ. भाजप १०० हून अधिक जागा जिंकेल आणि त्यानंतर आम्ही मुख्यमंत्रीपदावर दावा सांगू अशी माहितीही या नेत्याने दिली. दरम्यान, मुख्यमंत्रिपद आणि जागांची संख्या या दोन्हीबाबत भाजपच्या भूमिकेमुळे शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या गोटात नाराजी पसरली आहे. शिवसेनेच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले की, 'मुख्यमंत्रीपदावर आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही. शिंदे हेच मुख्यमंत्रीपदी कायम राहतील.', असे स्पष्ट केले.

## तालखेड फाटा येथील दोन शेतकऱ्यांच्या गायी चोरीस

माजलगाव दि २१ (बातमीदार) तालुक्यातील तालखेड फाटा येथील दोन शेतकऱ्यांच्या दोन गायी काल पहाटे चोरीस गेल्या असल्याने पशुपालकात चोरांची भीती निर्माण झाली आहे

तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या तालखेड फाटा येथील पंडित गुलाब ओव्हाळ व गंगाधर साहेबराव जाधव हे मागच्या अनेक वर्षांपासून या ठिकाणी वास्तव्यास आहेत त्यांच्या कडे पूर्वी पासून पाळीव गायी आहेत काल पहाटे त्यांच्या दोन गायी ची कोणी तरी अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना घडली आहे या चोरीच्या घटने मुळे या परिसरातील पशुपालका मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे तर शेतकऱ्यांना नगदी मोठं आर्थिक नुकसान झालं आहे

सद्या या परिसरात चोरीच्या घटना घडत असून पोलीस प्रशासनाने गस्त गस्त घालायची मागणी नागरिकांतुन होत आहे

## केज येथील साने गुरुजी निवासी विद्यालय जळगाव जिल्ह्यात स्वच्छ शाळा या पुरस्काराने सन्मानित

केज/प्रतिनिधि

गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव, आयोजित गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता २०२३/२४ या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज, संचालित साने गुरुजी निवासी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा राज्यस्तरीय स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव आयोजित गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता २०२३/२०२४ या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित, साने गुरुजी निवासी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने राज्यस्तरीय स्पर्धेत तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. सदर पारितोषिक वितरण गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव येथे पार पडले. या कार्यक्रमासाठी पद्मश्री डॉ. अनिल काकोडकर, गुजरात विद्यापीठाचे माजी कुलगुरू मा. श्री सुदर्शन अय्यंगार फाउंडेशनचे संचालक मा. श्री. अशोक जैन, स्पर्धा समन्वयक मा. श्री गिरीश कुलकर्णी, यांच्या उपस्थितीत



पारितोषिक वितरण कार्यक्रम पार पडला. विद्यालयाला माननीय श्री काकोडकर यांच्या हस्ते ५१ हजार रुपये व आकर्षक सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेमध्ये राज्यातील १६३ शाळा सहभागी झाल्या होत्या. यामधील अंतिम मूल्यांकनामध्ये ४१ शाळांची निवड करण्यात आली होती.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. ॲड.उद्धवराव कराड साहेब संस्थेचे उपाध्यक्ष माननीय श्री कापसे साहेब व विद्यालयाच्या मुख्याध्यापिका माननीय श्रीमती डॉ. कविताताई गित्ते( कराड) मॅडम तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

## श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे मोठ्या उत्साहात गुरूपौर्णिमा साजरी



लिंबागणेश:- बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीगुरू ईश्वरबाबा भारती महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन भुमीत श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव येथे प्रतिवर्षी प्रमाणेच यावर्षीही आज दि.२१ रविवार रोजी गुरूपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.सकाळी बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महादेव भारती महाराज व शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या शुभहस्ते भगवान बेलेश्वराच्या मुर्तीला अभिषेक, श्रीगुरू ईश्वरबाबा भारती महाराजांच्या समाधीची महापुजा करण्यात आली. वारकरी मंडळींच्या वतीने भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर महापंगतीच्या प्रसादाचा भाविकांनी आस्वाद घेतला. पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी गुरूपौर्णिमा निमित्त श्रीगुरू ईश्वरबाबा भारती समाधीचे दर्शन घेण्यासाठी व बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महंत महादेव भारती महाराज व शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांचे आशिर्वाद घेण्यासाठी मंदिरात गर्दी केली होती. गुरूपौर्णिमेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व ; गुरूप्रति आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस :- शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज गुरूपौर्णिमेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व असुन आषाढ महिन्याच्या पोर्णिमेच्या दिवशी गुरूपौर्णिमा उत्सव साजरा केला जातो.या दिवशी अध्यात्मिक, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रांतील गुरूप्रति आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली जाते.आषाढ महिन्यातील पोर्णिमा गुरूपौर्णिमा म्हणून ओळखली जाते. महर्षी वेदव्यास यांनी मानवजातीला चार वेदांच ज्ञान दिले.त्यामुळे महर्षी वेदव्यास यांना प्रथम गुरू मानलं गेलं. महर्षी वेदव्यास यांचा जन्म पोर्णिमेच्या दिवशी झाला होता.म्हणुन या पोर्णिमेला गुरूपौर्णिमा म्हणतात.

## मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत धर्मवीर -२ मुक्काम पोस्ट ठाणेफचित्रपटाच्या ट्रेलरचे अनावरण



प्रतिनिधी या कार्यक्रमास विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, आमदार आशिष शेलार, पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, झी समूहाचे पुनीत गोएंका, ज्येष्ठ अभिनेते जितेंद्र, अशोक सराफ, सलमान खान, सचिन पिळगांवकर, महेश कोठारे, बोमन इराणी, अभिनेते गोविंदा आहुजा, अभिनेत्री रकुलप्रीत सिंह, अभिनेता जॅकी भगनानी आदी उपस्थित होते. मंगेश देसाई आणि उमेशकुमार बन्सल यांनी 'धर्मवीर - २' या चित्रपटाची निर्मिती केली असून लेखन आणि दिग्दर्शन प्रवीण तरडे यांनी केले आहे. येत्या ९ ऑगस्टला हा चित्रपट मराठी आणि हिंदी या दोन भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

## कोल्हापूर विशालगडाच्या गाजीपुर धार्मिक स्थळांची विटंबना करणाऱ्या आरोपींना तात्काळ कठोर शासन करा - गणेश कवडे

**पाटोदा (प्रतिनिधी)**

गेल्या दोन दिवसांपूर्वी कोल्हापूर जिल्ह्यातील विशालगडाच्या पायथ्याशी असलेल्या गजापुर या ठिकाणी हातात तलवारी धारदार शस्त्र आणि दगड हातात घेवून मुस्लिम समाजातील घरावर हल्ला चढवला समाज कंटकांनी मुस्लिमांच्या घरांची, संपत्तीची नासधूस करत दर्गाह आणि मस्जिद या धार्मिक स्थळांची विटंबना करणाऱ्या आरोपींना तात्काळ कठोर शासन करावे अशी मागणी समाजिक कार्यकर्ते गणेश कवडे, भाई विष्णुपंत घोलप, सुरेंद्र तिपटे यांनी यांनी पाटोदा येथील मुक मोर्चाच्या सभेत रुपांतर झाले यावेळी बोलत होते, यावेळी तहसीलदार डि.बी. निलावड यांना निवेदन देण्यात आले आहे विशाल गडावरील अतिक्रमण काढण्याच्या नावाखाली अतिरेक झाल्या सारखेच आहे पवित्र मस्जिद आणि दर्गाशरीफ गेल्या अनेक वर्षापासून त्या ठिकाणी आहे. ती जागा फॉरेस्ट ऑफिस ची असून फॉरेस्ट ऑफिस व शासन कायदा कानुन बघून घेईल. वैयक्तीककोणाला ही अधिकार नाही असे गणेश कवडे पुढे



बोलताना म्हणाले अतिक्रमनाचा प्रश्न न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याने त्यावर निर्णय न्याय पालिका घेईल असे असे विष्णूपंत घोलप, आणि सुरेंद्र तिपटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अचानक पने घुसून हल्ला चढवणे आणि मुस्लिमांच्या घरांची नासधूस करत त्यांच्या जीवाला आणि संपत्तीला इजा निषेध मोर्चापोहचणे ही कोणती अतिक्रमण हटाव मोहीम अतिक्रमण काढायचे की ठेवायचे या बाबत निर्णय शासन न्यायपालिका घेईल असे हिंसक प्रकार करून धार्मिक स्थळांचा अपमान करून काय साध्य होणार आहे, व याची परवानगी कोणी दिली याची देखील चौकशी झाली पाहिजे. असे पुढे म्हणाले छत्रपती शिवाजी शाहु, फुले, आंबेडकर च्या पुरोगामी महाराष्ट्रात असे निंदनीय प्रकार अशोभनीय आहे सर्व धर्मियांची धार्मिक स्थळे ही त्यांच्या धार्मिक अस्मितेचा प्रश्न असतो आणि त्यावरील हल्ला हा मनाला वेदना देणारा ठरतो, व अश्या घटना सामाजिक सलोखा बिघडवण्यासाठी कारण ठरत असतात म्हणून या हल्ल्या मागे जो कोणी सूत्रधार असेल त्याची पाळेमुळे शोधून महाराष्ट्राचं सामाजिक वातावरण बिघडवणाऱ्या आणि गझापुर या ठिकाणी मुस्लिमांच्या संपत्तीची त्यांच्या घरांची आणि धार्मिक स्थळांची नासधूस करणाऱ्या लोकांचा शोध घेवून त्यांना कठोर शासन करावी अशी मागणी समाजिक कार्यकर्ते येथील सामाजिक कार्यकर्ते म्हणाले यावेळी भाई विष्णुपंत घोलप, गोरख झेंड, गणेश कवडे, चक्रपाणी जाधव, सुरेंद्र तिपटे (बाबा), सतिष गर्जे, सतिष उबाळे, प्रदीप उबाळे, सह हजारो मुस्लिम बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अड. सय्यद वहाब यांनी केले अखेरीस राष्ट्रगीताने झाले.

# राष्ट्रीय समाज पक्षात अनेक कार्यकर्त्यांचा जाहीर प्रवेश.जिल्हाध्यक्ष: अण्णासाहेब मतकर

## पंचायत समिती .जिल्हा परिषद. विधानसभा निवडणूक राष्ट्रीय समाज पक्ष स्वबळावर लढवणार, जिल्हाध्यक्ष मतकर

**बीड प्रतिनिधी ,अंकुश गवळी**

आज गुरुपौर्णिमा निमित्त पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथे श्री साईबाबा मंदिर या ठिकाणी कार्यक्रमास उपस्थित राहून जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांनी साईबाबांचा आशीर्वाद घेतला भावी भक्तांना मार्गदर्शन केलं. जिल्हा अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली काही पदाधिकाऱ्यांचा प्रवेश व निवडी यावेळेस घेण्यात आल्या. राष्ट्रीय समाज पक्षात सर्व जाती धर्मातील लोक गुण्यागोविंदाने एकत्र काम करतात. त्यामुळे सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन जाणारा हा एकमेव पक्ष आहे. पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर साहेब यांनी 18 पगड जातींना सोबत घेऊन पक्षाचे गाव कांड्यावर काम वाढून सर्वसामान्य माणसांना न्याय राष्ट्रीय समाज पक्षाने गाव ते शाखा व घर तिथे कार्यकर्ता ही मोहीम हाती घेतली 70 टक्के पक्षाची बांधणी झाली आहे त्यामुळे राष्ट्रीय समाज पक्ष येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये स्वबळावर विधानसभा निवडणुका लढवणार आहे. आज सर्वसामान्य लोकांना प्रस्थापित पक्षावर कुठलाही विश्वास राहिलेला नाही सर्वसामान्य प्रश्न सोडवायचे असतील तर बीड जिल्ह्यातील मायबाप जनतेने राष्ट्रीय समाज पक्षाला ताकद देऊन सर्वसामान्य



काम करण्यासाठी एक वेळेस राष्ट्रीय समाज पक्षांच्या उमेदवाराला मोठ्या मताधिक्याने निवडून आणलं पाहिजे मोठे लोक आपले काम करत नाहीत आणि आपण निवडणुका जवळ आले की त्यांचाच ऐकतो त्यामुळे यावेळेस आपणास बदल करण्याची संधी आलेली आहे आणि त्या पण करतील ही अपेक्षा जिल्हाध्यक्ष अण्णा सहमतकर यांनी कार्यकर्त्यांच्या समोर मांडली आहे. या ठिकाणी काही कार्यकर्त्यांचा प्रवेश घेण्यात आले. श्रीमती कविता राईस तालुका अध्यक्ष रासपा पाटोदा, श्रीमती सुरेखा बेद्रे तालुका उपाध्यक्ष रासपा पाटोदा, श्रीमती अनिता महारनवर तालुका सचिव रासपा पाटोदा, श्री विकास घुगे अमळनेर सर्कल प्रमुख, श्री अशोक शिंगटे अमळनेर गन प्रमुख, श्री बाळासाहेब आसराची सानप सौताडा गन प्रमुख, श्री मिसाळ गहिनीनाथ व इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. तसेच धनवटे व महानोर यांनी राष्ट्रीय समाज पक्षांच्या जिल्हाधिकाऱ्यांचा व कार्यकर्त्यांचा मानसन्मान केला. त्याबद्दल राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने त्यांचे खूप खूप धन्यवाद. उपस्थित राष्ट्रीय समाज पक्ष जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष परशुराम काशीद, तालुका अध्यक्ष पाटोदा आसाराम महानोर युवक तालुका अध्यक्ष पाटोदा कल्पेश भोंडवे , एडवोकेट बाळासाहेब सोलनकर, भाऊसाहेब दिंडे आष्टी तालुका अध्यक्ष आष्टी तालुका उपाध्यक्ष लक्ष्मण भिसे, पत्रकार अंकुश गवळी या संस्थेचे चालक धनवटे साहेब तसेच सर्व महिला मंडळ पुरुष मंडळ बहुसंख्येने उपस्थित होते.

## !! विचारधन !!



नातं म्हटलं की विश्वास आला , आपल्या जीवनातील कुठलाही नातं घ्या,पती पत्नी घ्या,आई मुलगा,मैत्री,प्रत्येक नात्यामध्यें एकमेकांवर विश्वास असलाच पाहिजे,त्या विश्वासावरच नाती टिकून असतात,एखाद्या तिसऱ्या लोकांच्या बोलण्यावरून , कधीही जिवा भावाची नाती तोडू नका , आपल्या नात्या मध्ये दुरावा निर्माण करू नका , मित्रानो कान आणि डोळे या मध्ये खूप अंतर आहे , जो पर्यंत नात्या मधील सत्य डोळ्याने पाहत नाही , तोपर्यंत नाती तोडू नका , नाही तर फक्त पस्तावा होत असतो , आणि लाख मोलाची नाती आपली तुटून जात असतात , आयुष्य नात्या मुळेच सुंदर बनत असते , विसरू नका . म्हणूनच आपल्या काना पेक्षा डोळ्यावर विश्वास ठेवा , आणि नाती आयुष्यभर टिकवून ठेवा .....

श्री केशव चिलगर
जय हो... ?

# खरीप हंगामात फवारणी कधी आणि कशी करावी

हंगाम म्हटलं कि बऱ्यापैकी शेतकरी बांधव शेतीकामांमध्ये व्यस्त असतात मग त्यात पेरणी, लागवड, खत टाकण, फवारण्या कारण, पावसाचं पाणी शेतात साचून राहिलं असेल तर ते शेताबाहेर काढून देणे, बियाण्याची उगवण व्यवस्थित झाली नसेल तर दुबार पेरणी करने किंवा पिक सांधून घेण इत्यादी. या सगळ्यात महत्वाच काम असत ते म्हणजे फवारणीच. कारण इतर काम थोडीफार पुढेमागे झाली तर हरकत नसते परंतु फवारणी करताना पिकाची अवस्था कोणती आहे, कीड रोगांचा प्रादुर्भाव किती आहे, हवामान कसं आहे या सगळ्या गोष्टींचा विचार करावा लागतो. म्हणून या लेखातून फवारणी करताना नेमकी काय काळजी घ्यावी, फवारणी कधी घ्यावी, कधी टाळावी याबद्दल सविस्तरपणे चर्चा करणार आहोत. फवारणी करण्याअगोदर पावसाचा अंदाज घेणे अत्यंत महत्वाच आहे. कमी कालावधीच्या पावसाचा अंदाज बांधणे थोडं अवघड जात परंतु आजकाल बऱ्याच माध्यमांद्वारे पावसाचा अंदाज घेता येतो. मोबाईलवर मिळणारे मेसेज, व्हाटसएप, दामिनी एप, मेघदूत एप, विद्यापीठांमधून प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिक कृषि पत्रिका याद्वारे अंदाज बांधता येतो. फवारणी नंतर किमान 4 तास पाउस पडणार नाही हे पाहूनच फवारणी करावी. फवारणी करतेवेळी जमिनीमध्ये ओल असण महत्वाच आहे. पावसामध्ये खंड पडला आहे, वातावरण कोरड आहे अशावेळी सकाळी किंवा सायंकाळी फवारणी करावी. पाणी देण्याची सोय नसेल तर शक्यतो सकाळी फवारणी करावी कारण त्यावेळी मातीमध्ये थोडा ओलसरपणा असतो. जमिनीचा वरचा एक इंच भाग कोरडा आणि खाली ओलसर



माती म्हणजे पिकांच्या मुळाशी ओलसरपणा असणे महत्वाचे आहे. तणनाशक जेव्हा फवारल जात तेव्हा मातीमध्ये ओलावा तपासण अनिवार्य असत. उन्हामध्ये फवारणी करणे पूर्णपणे टाळावे. फवारणी करताना शेतकऱ्यांनी स्वतःची काळजी घेतली पाहिजे. फवारणी करते वेळी फवारत असलेल द्रावण डोळ्यात, नाका-तोंडात जाणार नाही याची पूर्ण काळजी घ्यावी. त्यासाठी संरक्षक कपडे, गमबूट, हातमोजे, नाकावरील मास्क, डोक्यावर कापड, गॉगल इत्यादी सरंक्षण साहित्याचा वापर फवारणी करताना करावा. फवारणी अगोदर शेताचं निरीक्षण करण अत्यंत महत्वाच आहे. नेमकी कोणती कीड किंवा कोणता रोग पिकावर आला आहे हे पाहूनच निविष्ठा कोणती वापरायची तसेच त्याचं प्रमाण किती असलं पाहिजे हे ठरवावं. बऱ्याच वेळा शेतकरी अधिक प्रादुर्भाव नसतानाही औषधाच प्रमाण अधिक घेतात. त्यामुळे



पिकाला फायदा होण्या ऐवजी पिक पिवळे पडणे पिक कोमेजून जाणे हे प्रकार पाहायला मिळतात. कोणतीही फवारणी करताना औषधाच्या बॉटल किंवा पाकिटावरील लेबल व माहिती वाचून समजून घ्यावी. फवारणी करतानाच्या खबरदारीच्या सर्व सूचनांचे पालन करावे. तसेच आपण नेमकं काय फवारात आहोत याची किमान दोन वेळा खात्री करून घ्यावी कारण बॉटल वर लिहिलेलं न वाचता आल्यामुळे तननाशक फवारल आणि सोयाबीनचा संपूर्ण प्लॉट गेला अशा घटना घडत आहेत आणि शेतकऱ्यांना नाहक नुकसान सहन करावं लागत आहे. बॉटल वरील लाल रंगाचे त्रिकोणी आकाराचे चिन्ह असलेली कीटकनाशके अत्यंत विषारी त्यानंतर पिवळा, नीळा आणि शेवटी हिरवा असा क्रम लागतो. हि चिन्हे सोपी, साधारण आणि लिहिता वाचता न येणाऱ्या व्यक्तीला समजण्यासाठी असतात. हिरव्या रंगाचे चिन्ह असलेली किटकनाशके कमीत कमी विषारी असतात. तननाशक फवारणीचा पंप चुकूनही कीटकनाशक फवारणी साठी वापरू नये. फवारणी साठी वापरलेले सर्व साहित्य पाण्याने स्वच्छ धुवून ठेवावेत. झिझलेले, खराब झालेले नोझल बदलून घ्यावेत. कोणत्याही द्रावनाला, रसायनाला हुंगणे किंवा वास घेणे टाळावे. वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने फवारणी करू नये तसेच उंच झाडांवर किंवा पिकावर फवारणी करताना औषध अंगावर पडणार नाही याची काळजी घ्यावी. सेंद्रिय शेतीमध्ये कोणतही रासायनिक किटकनाशक वापरता येत नाही. जैविक पद्धतीने तयार केलेल्याच निविष्ठा वापरता येतात. तसेच कोणतही रासायनिक तणनाशक सेंद्रिय शेतीमध्ये वापरण्याची परवानगी नसते याची सेंद्रिय शेती करत असलेल्या सर्व शेतकरी बांधवांनी नोंद घ्यावी.

सेंद्रिय शेती अभ्यासक – पल्लवी चिंचवडे

# देवा पर्यंत पोहचण्यासाठी माऊली दादांकडे या नाना महाराज कदम यांचे प्रतिपादन..

**बीड (प्रतिनिधी)**

बीड प्रतिनिधी - महाराष्ट्रातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी 20 व्या शतकातील महान संत विभूती सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडी यांच्या पवित्र पावन भूमीमध्ये गुरुपौर्णिमा महोत्सवा निमित्त दिनांक 21 जुलै 2024 रोजी प्रमुख मार्गदर्शक तपो निधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री.ह.भ.प महादेव महाराज ( तात्या ) श्रीक्षेत्र चाकरवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली रामायणाचार्य श्री.ह.भ.प नाना महाराज कदम श्री बंकटस्वामी महाराज मठ संस्थान श्रीक्षेत्र नेकनूर यांचे कीर्तन संपन्न झाले. महाराजांनी श्रीगुरुसारिखा असतां पाठीराखा । इतरांचा लेखा कोण करी ॥१॥ राजयाची कांता काय भीक मागे । मनाचिया जोगे सिध्दि पावे ॥२॥ कल्पतरुतळवटीं जो कोणी बैसला । काय वाणी त्याला सांगिजोजी ॥३॥ ज्ञानदेव म्हणे तरलों तरलों । आतां उध्दरलों गुरुकृपें ॥४॥ या अभंगावर आपली सेवा दादांच्या चरणी संपन्न केली. जीवब्रह्यैक्य ज्ञानदान करण्यामध्ये ईश्वरापेक्षा अत्यंत श्रेष्ठ अशा श्रीगुरूचा पाठिंबा असेल तर इतर ज्या रिद्धिसिद्धी किंवा संसारिक सुखे यांची पर्वा कोण करील. मनाप्रमाणे सर्व ऐश्वर्य भोगण्यास मिळणाऱ्या राजाच्या बायकोला भीक मागावयाला जाण्याची पाळी येईल काय? किंवा कल्पतरूखाली बसलेल्या पुरूषास काय कमी आहे. श्रीगुरू निवृत्तिरायांच्या कृपेने माझा उद्धार झाला म्हणून मी संसार समुद्रांतून पार पडलो. असे माऊली ज्ञानदेव सांगतात. ज्या वेळेस माणूस मोठा होतो ना त्याला कोणीच मोठे करत नाही त्याची श्रध्दा चांगल्या ठिकाणी असल्यामुळे तो मोठा झालेला असतो. माणसाने देवाला ज्या ठिकाणी ठेवले आहे त्या ठिकाणीच माणसाने राहावे. सुदाम बाबा सांगायचे आपला हात भविष्य साठी कोणाकडे कडे दाखवायचा नाही. आपला वर्तमान चांगला ठेवा भविष्य नक्किच तुमचे चांगले असेल अशी यावेळी सुदामदेव बाबा यांची आठवण काढली. देवाच्या हातात आपले आयुष्य आणि भविष्य असते. आपल्या जीवनात आपली किंमत वाढवयाची असेल तर माउली दादांच्या तराजूत बसा. अज्ञानाकडून ज्ञान रुपी प्रकाशाकडे नेतात त्यांना गुरू असे म्हणतात. जन्म झाल्यावर आपले पाहिले गुरू हे आपले आई वडील आहेत. ज्ञानाला किंमत नाही तर ब्रम्हज्ञानाला किंमत आहे. माणसाच्या जीवनात ब्रम्हज्ञान प्राप्त करुन देणारे हे श्री गुरु असतात. देवा पर्यंत पोहचण्यासाठी श्री गुरूच लागतात. दादा, स्वामी महाराज यांच्या सारखे परीस जवळ सांभाळा नक्किच आपले सोने झाल्या शिवाय राहणार नाही.



सेवा करत असाल तर तुम्ही देवाची, संतांची सेवा करतात. देवा पर्यंत पोहचण्यासाठी माऊली दादांकडे या. आपल्या जीवनात कोणचा तरी आशीर्वाद पाहिजे. चांगली अपेक्षा मनात तुम्ही माऊली दादांच्या दरबारात ठेवली ना तर ती अपेक्षा पूर्ण झाल्याशिवाय राहत नाही. ध्येय तुम्ही ठरवा तिथं पर्यंत पोहचण्यासाठी संत, देव तुम्हाला नक्किच पोहोचतील. अनंत अडचणी येऊद्या तुम्हाला दादा त्या ध्येया पर्यंत तुम्हाला नक्किच पोहच करतील. महाराजांनी अभंगातून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.महाराजांनी त्यांच्या गोड वाणीतून भाविक भक्तांना गोड असा संदेश दिला. गोड अश्या अभंगातून भाविक भक्त किर्तन एकूण भारावून गेले. सर्वांना शेवटी गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी मृदंगसाथ ह. भ. प अमोल महाराज पवार चाकरवाडीकर, आविष्कार महाराज क्षीरसागर , गायनाचार्य ह. भ. प अभिमान महाराज ढाकणे, ह. भ. प प्रशांत महाराज क्षीरसागर, ह. भ. प त्रिंबक महाराज शेळके, ह. भ. प हरिभाऊ महाराज काळे, ह. भ. प अनुरथ महाराज श्री क्षेत्र चाकरवाडीकर तसेच महाराज मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते.

# हनुमान कोळीवाडा येथे जागतिक कांदळवन दिन साजरा.

**उरण/प्रतिनिधी**

महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रेडिशनल फिश वर्कस युनियन,पारंपारिक मच्छीमार बचाव सामाजिक कृती समिती व कांदळवन विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कांदळवन दिनाचे औचित्य साधून रविवार दि २१ जुलै २०२४ रोजी उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा या गावातील श्री हनुमान मंदिर येथे जागतिक कांदळवन दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडिशनल फिश वर्कर्स युनियनचे अध्यक्ष नंदकुमार पवार, ग्राम सुधारणा मंडळाचे अध्यक्ष सुरेश कोळी,वन परिक्षेत्र उरणचे अधिकारी एन जी कोकरे तसेच इतर मान्यवरांनी कांदळवनाचे महत्व तसेच जागतिक कांदळवन दिन का साजरा केला जातो याची सविस्तर माहिती दिली.



नागरिकांच्या विविध शंका,समस्यांचे समाधान यावेळी करण्यात आले. यावेळी शासनाच्या विविध उपक्रम,प्रकल्प याविषयी ग्रामस्थांना नागरिकांना माहिती देण्यात आली. मंदिरात कांदळवनशी संबंधित निसर्गाचे संवर्धन संरक्षण करणारे निसर्ग चित्राचे सुंदर अशा रांगोळी रेखाटण्यात आली. सर्व मान्यवरांनी सदर रांगोळीचे कौतुक केले. त्यानंतर उपस्थित सर्वच ग्रामस्थ, उपस्थित सर्वच मान्यवरांनी हनुमान कोळीवाडा गावाला लागून असलेल्या खाडीच्या किनाऱ्यावर कांदळवन परिसरात साफसफाई केली.या उपक्रमात हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांचाही उत्तम प्रतिसाद लाभला होता.यावेळी एन. जी. कोकरे. वन परिक्षेत्र अधिकारी उरण.नंदकुमार पवार- अध्यक्ष महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडीशनल फिश वर्कर्स युनियन,रमेश भास्कर कोळी- अध्यक्ष पारंपारिक मच्छिमार बचाव कृती समिती, सुरेश दामोदर कोळी- अध्यक्ष ग्राम सुधारणा मंडळ हनुमान कोळीवाडा,सुनील महाडिक - वनपाल वन विभाग,महेश राजपूत -अध्यक्ष रोटरी क्लब कळंबोली,भरत शिंदे- सचिव रोटरी क्लब कळंबोली, माजी अध्यक्ष- साधना भगत, प्रेसिडेंट इलेक्ट - प्रसाद पाटील, जेष्ठ रोटरीयन सय्याजी साळुंके, रोटरी क्लब ऑफ पनवेल सिम्पनीचे सौरभ सोमाणी. गंगाधर चिटकरे जिल्हा समन्वय अधिकारी,आशा वाले-वन रक्षक,परमानंद कोळी, माजी सरपंच ग्रामपंचायत हनुमान कोळीवाडा,मंगेश कोळी -उपाध्यक्ष ग्राम सुधारणा मंडळ हनुमान कोळीवाडा, डोमनिक कोळी उरण कोळीवाडा,तुकाराम कोळी उरण कोळीवाडा,कृष्णा कोळी गव्हाण कोळीवाडा, तसेच ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.अशा प्रकारे जागतिक कांदळवन दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रेडिशनल फिश वर्कस युनियन,पारंपारिक मच्छीमार बचाव सामाजिक कृती समिती व कांदळवन विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या साफसफाई उपक्रमाला सर्वच स्तरातून उत्तम प्रतिसाद लाभला आहे.

# अजित पाटील यांना शाहू प्रेरणा गौरव पुरस्काराने सन्मान

**कुडूत्री/ प्रतिनिधी**



अनंतशांतीचे मार्गदर्शक, राजर्षी शाहू गव्हर्नमेंट बँकेचे माजी उपाध्यक्ष अजित शंकर पाटील मांगोली (तालुका राधानगरी) यांना दैनिक रोखठोक वृत्तपत्राच्या वतीने देण्यात येणारा शाहू पेरणा पुरस्कार(२०२४) नुकताच कोल्हापूर येथे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.


पाटील यांनी पाटबंधारे विभागात फक्त नोकरी न करता समाजकार्याला वाहून घेऊन समाजाबद्दल असलेली तळमळ त्यांच्या कृतीतून सतत व्यक्त असते त्यांनी सामाजिक कार्यात गेली दहा वर्ष विविध शासकीय विभागातील महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन, तसेच ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरण करण्यासाठी विविध प्रकारच्या जन-जागृती अभियान, दुर्गम-डोंगराळ भागातील गरीब मुलांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप, करून त्यांचा शैक्षणिक दर्जा वाढवण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.ज्या महिला समाजासाठी समाज हिताचे कार्य करतात अशा विविध महिलांना गौरव करून त्यांना प्रोत्साहन कार्यक्रमाचे आयोजना बरोबरच बीड, उस्मानाबाद, व लातुर,जालना आदी जिल्ह्यातून व राज्यातुन ऊस तोडणीसाठी आलेल्या कामगारांना दिवाळी निमित्त फराळ वाटप केले आहे.राधानगरीतील ग्रामीण डोंगराळ दुर्गम भागातील गरीब व गरजू ना मदत, राधानगरी जंगल व त्या भागातील अति मागास लोकांच्या साठी विविध संस्थांच्या माध्यमातून आरोग्य शिबीर व मार्गदर्शन शिबिर, पोलीस, पाटबंधारे, कृषी, व इतर शासकीय व निमशासकीय महिलांच्यासाठी विविध पुरस्काराचे वितरण,मोफत डोळे तपासणी शिबिर आदी कार्यात त्यांचा हिरिरीने सहभाग असतो.

त्यांना मिळालेल्या पुरस्काराने त्यांचे जिल्ह्यातून अभिनंदन होत असून आजपर्यंत त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

# श्री स्वामी समर्थ मंदिर कुर्डूवाडी येथे गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी

**सोलापूर (प्रतिनिधी)**

भारतीय संस्कृतीमध्ये गुरूंना देव समजले जाते व गुरूंची पूजा केली जाते म्हणून अशा या गुरूंना वंदन करण्यासाठी गुरु पौर्णिमा या दिवशी गुरूंचे पूजा केले जाते. त्यामध्ये गुरुपौर्णिमा हे दरवर्षी मोठ्या उत्साहात आनंदात आणि श्रद्धापूर्वक साजरी केली जाते.लहानांपासून ते वृद्धांपर्यंत प्रत्येक जण आपापल्या गुरूंची कृतज्ञता व्यक्त करत असतो. यामध्ये श्री स्वामी समर्थ मंदिर व श्री भुजंगनाथ मोहिते गुरुजी समाधी मंदिर कुर्डूवाडी येथे दिनांक २१/०७/२०२४ रोजी गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यामध्ये स्वामी समर्थ महाराज मूर्तीला व



गुरुजींच्या समाधी स्थळाला गोविंद मोहिते,व कृष्णा मोहिते, ह भ प अनिरुद्ध ढेरे ह.भ.प.महारुद्र भादुले यांच्या हस्ते दुग्धाभिषेक करण्यात आला व शिष्यांनी गुरूंच्या चरणावर फुलपुष्प वाहून मनोभावे पूजा केली.त्यानंतर ह भ प शशिकांत (आण्णा) माने बैरागवाडी यांचे प्रवचन तसेच ह भ प गोरे काका परभणीकर यांचेही प्रवचन झाले. त्यानंतर महाप्रसादाचा सर्वांनी लाभ घेतला महाप्रसादाचे आयोजन परमेश्वर अर्जुन चोपडे व अरुण माने (साहेब) यांनी केले होते. गुरु पौर्णिमेसाठी परभणी, अहमदनगर,कुर्डुवाडी जवळील खेड्यातून ही शिष्यगण एका ठिकाणी जमा झाले होते. अशाप्रकारे गुरु पौर्णिमेचा कार्यक्रम संपन्न झाला.

# स्वाराती रुग्णालय आहे कि लुटारूचा अड्डा ? रुग्णाचे बेहाल, डॉक्टर करतायत रुग्णांची पळवा पळवी !

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

अंबाजोगाई स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय हे गोरगरीब रुग्णांची जीवन संजीवनी मानली जाते मात्र येथे मागील काही महिण्यापासून रुग्णाचे हेळसांड होत असून रुग्णांची प्रचंड लूट केली जात आहे. अति दक्षता वार्डात जाण्यापूर्वी देवासमोर कर्मचारी १०० रुपये ठेवायले सांगतात डिस्चार्ज होताना कर्मचाऱ्यांना पैसे



द्यावे लागतात अद्यावत ब्लड बँक असताना शहरातील बाहेरच्या लॅब वाल्याकडे रक्त तपासणी साठी पाठवले जाते विशेषतः त्यांनी सांगितलेल्या लॅब मध्येच जावे लागते किंबहुना इतर लॅब चा रिपोर्ट आणला तर ते पाहतही नाही परिणामी रुग्णांना आर्थिक लुटिचा सामना करावा लागतो. ठराविक औषध वगळता बहुतांश गोळया औषधे बाहेरच्या मेडिकल वरून घ्यावी लागतात दवाखाना चे प्रधानमंत्री जनऔषधी मेडिकल हे नावालाच असून औषध विक्री मात्र इतर मेडिकल च्या भावाने होत असून इथेही रुग्णांची लूट होत आहे त्याच बरोबर येथील शासकीय सेवेत असणारे डॉक्टर पत्नी व नातेवाईकांच्या नावावर काढलेल्या खाजगी रुग्णालयात रुग्णसेवा देण्यात व्यस्त असल्याने स्वार्थी रुग्णालयातील रुग्णांना वेळेत उपचार होत नाहीत तसेच येथे येनाऱ्या रुग्णांची पळवा पळवी येथील डॉक्टर करत त्यांच्या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी येण्यास सांगतात येथेही त्यांची लूट होत असून स्वाराती रुग्णालय आहे की लुटारूचा अड्डा हा प्रश्न पडत असून स्वाराती रुग्णालयातील रुग्णांची हेळसांड व लूट थांबवण्याकरता कोणताही सामाजिक कार्यकर्ता पुढे सरसावत नसल्याने अंबाजोगाई डिजिटल मीडिया परिषद पुढे येत स्वरातीचे अधिष्ठाता यांना निवेदन दिले यावेळी उपाध्यक्ष संजय जोगदंड, मार्गदर्शक सतीश मोरे, सचिव मोहम्मद फैझान, गजानन चौधरी, उत्तरेश्वर शिंदे, अहमद पठाण हे उपस्थित होते स्वरातीर येथे कार्यरत डॉक्टरांच्या खाजगी प्रॅक्टिस बंद करावी तसेच रुग्णांची होणारी आर्थिक लूट थांबवली गेली नाही तर डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे हे आजपासून आमरण उपोषणास बसणार आहेत. या उपोषणाला डिजिटल मीडियाचे सर्व पत्रकार व विविध पक्षाचे नेते मंडळी सामाजिक कार्यकर्ते यांनी पाठिंबा दिला आहे.

# शिवसंकल्प असोसिएशन तर्फे गरीब गरजू विद्यार्थिनीस शैक्षणिक साहित्य आणि आर्थिक मदत



**उरण /प्रतिनिधी** सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने स्थापित झालेल्या शिवसंकल्प समालोचक असोसिएशन, उरण-रायगड च्या तर्फे रांजणपाडा येथील वडिलांचे छत्र हरपलेल्या कु. तेजस्वी नरेंद्र तांडेल या अकरावीत शिकत असलेल्या गरीब विद्यार्थिनीस वह्या पुस्तके सर्व शैक्षणिक साहित्य, शाळेचा गणवेश आणि शैक्षणिक फी च्या स्वरूपात आर्थिक मदत देण्याचा कार्यक्रम धुतुम ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते की ज्यांच्या हस्ते शहीद जवानांच्या मदतीसाठी दरवर्षी पाच लाखाचा निधी दिला जातो अश्या दानशूर व्यक्तिमत्वाच्या हस्ते त्यांच्याच धुतुम येथील ऑफिस मध्ये पार पडला. यावेळी असोसिएशनच्या मदती सोबतच धनाजी ठाकूर यांच्या वतीने ५ हजारांची मदतही सदर विद्यार्थिनीस देण्यात आली.कार्यक्रमाप्रसंगी बोलताना धनाजी ठाकूर यांनी असोसिएशनचा संकल्प आणि आजवर केलेल्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करून असोसिएशनला माझ्यातर्फे कधीही कोणत्याही स्वरूपाची मदत लागल्यास नि:संकोच पणे केली जाईल असे अभिवचन दिले.सदर कार्यक्रमास धनाजी ठाकूर यांच्या समवेत असोसिएशनचे अध्यक्ष नितेश पंडित, उपाध्यक्ष श्याम ठाकूर, कार्याध्यक्ष पप्पू सूर्यराव, सचिव सुनिल वर्तक, सहसचिव विद्याधर गावंड, सदस्य देव डाकी, दर्शना माळी, हेमाली म्हात्रे, जगदीश कदम, विद्यार्थिनीच्या परिवारातील विकास पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीस असोसिएशन चे सचिव सुनिल वर्तक यांनी उपस्थितांचे स्वागत करून असोसिएशन स्थापनेचा हेतू आणि कार्याची संकल्पना मांडली, असोसिएशन चे अध्यक्ष रायगड चे सुप्रसिद्ध निवेदक नितेश पंडित यांनी आपल्या प्रास्ताविकात असोसिएशन च्या या अगोदर केलेल्या कार्याचा उल्लेख करताना चालू वर्षातील नियोजित सामाजिक उपक्रमांची माहिती विशद केली तर असोसिएशनच्या सदस्या तथा सुप्रसिद्ध निवेदिका दर्शना माळी यांनी सामाजिक कार्य करताना समाधान आणि काम करण्याची ऊर्जा मिळत असल्याचे सांगून मदत दिलेल्या विद्यार्थिनीस यापुढेही असोसिएशनच्या माध्यमातून शैक्षणिक कार्यात मदत करण्याची हमी देऊन उपस्थितांचे आभार मानले.

# पेण मध्ये अक्षता म्हात्रे हिच्या हत्येच्या विरोधात मोर्चा !

**पेण प्रतिनिधी** :पेण शहरात स्व. अक्षता म्हात्रे हिच्या हत्येच्या विरोधात निषेध मोर्चा काढण्यात आला होता. नवी मुंबईत अक्षता कुणाल म्हात्रे हिच्यावर अत्याचार करून तिचा निर्गुण खून केल्याच्या निषेधार्थ पेण मधील नारी शक्ती मंच, शिवप्रेमी संघटना, सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्तान व इतर संघटना यांच्या वतीने हा निषेध मोर्चा मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात नारीशक्तीच्या नंदा म्हात्रे, मोहिनी गोरे, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख दिपश्री पोटफोडे, नगरसेविका वसुधा पाटील, नमिता म्हात्रे, मुस्कान झटाम, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख विष्णू पाटील, सह्याद्री प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष समीर म्हात्रे, माजी सरपंच महेंद्र ठाकूर, भाजपचे बंडू खंडागळे, सामाजिक कार्यकर्ते राजन झेमसे, सीआर म्हात्रे, युवा सेनेचे तालुकाप्रमुख योगेश पाटील यांच्यासह विविध सामाजिक संघटना व विविध पक्षांचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, महिला व तरुण वर्ग मोठ्या



संख्येने सामील झाले होते.

यावेळी निषेध व्यक्त करताना नंदा म्हात्रे, विष्णू पाटील, समीर पाटील यांनी झालेला प्रकार हा माणुसकीच्या नात्याला काळिंबा फासणारा आहे. दोन वर्षांपूर्वी पेण मध्ये देखील एका लहान बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्गुन खून करण्यात आल्याची घटना घडली होती. त्यानंतर एका विवाहितेवर अत्याचार करून तिचा खून केल्याची ही घटना अतिशय गंभीर आहे.

त्यामुळे शासनाने हा खटला जलद गती न्यायालयात चालवावा व यातील आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी केली.

# नवऱ्या विरोधात पत्नीची पोलिसात तक्रार

**अंजनाने गेल्या काही दुवसा पूर्वीच वडसावित्री पौर्णिमेला जन्मो जन्मी हाच नवरा मिळू दे म्हणत तीन केला नवस अन नवऱ्याने तिच्या डोक्यावरचे छतच काढून नेले.अशी प्रचिती बिचारीच्या नशिबी येऊन ठेपली.**

**नांदेड प्रतिनिधी**

नांदेड : किनवट - गोकुंदा येथे राहणाऱ्या अंजना राजू कंधारे (वय ३३) या महिलेला तिच्या नवऱ्याने भर पावसाळ्यात घरावरचे पत्रे काढून नेल्याने ती महिला अक्षरशः पावसात भिजत राहत असून ती मोलमजुरी करत आपल्या दोन लेकरांचा सांभाळ करते नवऱ्याने दुसरे लग्न केल्यामुळे पहिल्या पत्नीला तो वारंवार त्रास देत असून पत्नीने त्याच्या विरोधात पोलिसात तक्रार दिली आहे. दि.१६-जुलै रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास



माझा नवरा राजु कंधारे हा दारु पिवुन तु माझ्या घरातुन निघुन जा म्हणत मला शिवीगाळ करीत तू माझ्या घरात राहू नको म्हणत लाथाबुक्याने मारहाण केली. तेव्हा मी त्यास घरातुन जात नाही, असे म्हणाल्याने त्याने मला परत मारहाण करुन घरातील सामान अस्तव्यस्त फेकुन दिले.व जीवे मारण्याची धमकी दिली. माझा संसार उघड्यावर असून मी मोलमजुरी करून कुटुंबाची उपजीविका भागविते.मला एक मुलगी व एक मुलगा आहे.मी माझ्या लेकरांचा सांभाळ करत असून मला नवरा व सासरच्या मंडळी कडून मानसिक त्रास होत असल्याची महिलेने पोलिसात नवऱ्याविरोधात कारवाई करण्याची विनंती अर्जात केली आहे.

# तुम्हाला प्रश्न विचारण्याचा अधिकार नाही, अजित पवार यांनी शरद पवार यांना सुनावले

**प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात पवार कुटुंबियांचे वर्चस्व आहे. पवार कुटुंबियांमध्ये अजित पवार यांनी काका शरद पवार यांच्यापासून वेगळी भूमिका घेतली. ते महायुतीसोबत गेले तर शरद पवार महाविकास आघाडीसोबत राहिले. त्यानंतर काका-पुतणे एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी सोडत नाही. शनिवारी पुण्यात एक वेगळीच घटना घडली. शरद पवार आणि अजित पवार एकाच बैठकीत होते. त्यावेळी शरद पवार यांनी प्रश्न विचारला. परंतु तुम्हाला प्रश्न विचारण्याचा अधिकार नाही? असे अजित पवार यांनी सुनावले. या घटनेची चर्चा चांगली होत राहिली. अजित पवार यांची प्रश्नावर नाराजीजिल्हा नियोजन समितीमध्ये (डीपीडीसी) हा किस्सा शनिवारी घडला. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री म्हणून अजित पवार होते. त्यावेळी खासदार म्हणून शरद पवार, सुप्रिया सुळे उपस्थित होते. या बैठकीत शरद पवार यांनी प्रश्न विचारला.



तहसीलदारांनी कुठे किती फंड दिली आहे? ते आकडे दाखवा, असे शरद पवार यांनी विचारले. शरद पवार यांच्या प्रश्नावर अजित पवार यांनी नाराजी व्यक्त केली. तुम्ही फक्त निमंत्रित सदस्य आहोत, बैठकीत तुम्हाला प्रश्न विचारण्याचा अधिकार नाही, असे अजित पवार यांनी म्हटले. बैठकीत फक्त जिल्हा नियोजन समितीचे सदस्यच प्रश्न विचारु शकतात, हा नियम त्यांनी दाखवून दिला. प्रोटोकॉलचे शरद पवार यांच्याकडून पालनबैठकीसाठी अजित पवार येताच शरद पवार उठून उभे राहिले. अजित पवार अध्यक्ष असल्यामुळे प्रोटोकॉलचे पालन करत शरद पवार उठून उभे राहिल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. या घटनेतून सर्वांनी शिकायला पाहिजे. राजकारण राजकारणाचा ठिकाणी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. शरद पवार खासदार म्हणून या बैठकीत सहभागी झाले होते. अजित पवार यांनी शरद पवार यांना सुनावल्यानंतर वाद सुरु झाला आहे. खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, माझ्याकडे जीआर आहे. त्या जीआरनुसार आमंत्रित सदस्य डीपीडीसीच्या सभेत प्रश्न विचारु शकतात. परंतु सत्ताधारी पक्षाला हुकुमशाही पद्धतीने काम करायचे आहे. त्यांना घटना बदलायची आहे. शरद पवार यांनी निधी वाटपासंदर्भात प्रश्न विचारला होतो. त्याचे उत्तर दिले गेले पाहिजे होते.

## पैठण येथे भानुदास महाराजांची ५११वी पुण्यतिथी साजरी

**छत्रपती संभाजीनगर (चैताली औटे)**

दक्षिण काशीतील श्री क्षेत्र पैठण येथे दि.२० शनिवारी आषाढ शुद्ध चतुर्दशी शुभ पर्वतावर मोठ्या उत्साही व भक्तिमय वातावरणात गावातील नाथ मंदिरात संतश्रेष्ठ भानुदास महाराज यांची ५११ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. पुरोहित नागेश उपाध्ये यांच्या मंत्रघोषात प्रदीप गोसावी, चैतन्य गोसावी, प्रशांत गोसावी यांच्या हस्ते विजयी पांडुरंग व भानुदास महाराज मूर्तीचा महा अभिषेक करण्यात आला.यावेळी भाविकांनी भानुदास एकनाथांचा गजर करून



मंदिर दुमदुमून टाकले. या प्रसंगी हरी पंडित महाराज गोसावी यांनी भानुदास महाराजांच्या कार्यावर मनोगत व्यक्त केले.यावेळी महिलांनी भजने ,भावगीते व भारुडे गायली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भक्ती कुलकर्णी, मीरा भवर, जयश्री मडके, पूजा पारिख ,जयश्री भावसार ,निर्मला पोपळघट, जयश्री कुलकर्णी, महेश मडके, तुकाराम बडसल, काका लोहकडे, दिलीप कबाडे, रवींद्र कोरंगे, विश्वनाथ थेटे, जगदीश पाचोडकर, महेंद्र महाराज बनकर नागपूरकर, अशोक कुलकर्णी, प्रकाश खेडेकर, दिनेश पारिख ,बंडेराव जोशी आदींनी विशेष परिश्रम घेतले.भानुदास महाराज प्रतिमेवर पुष्पवृष्टी करून महाआरतीने उत्सवाची सांगता झाली. भानुदास महाराजांचा जन्म पैठण मध्ये इसवी.सन १४४८ मध्ये झाला . भानुदास महाराजांनी कर्नाटकातील विजयनगर येथून कृष्ण देवराया राजाकडून पांडुरंगाची मूर्ती पुन्हा मिळवली व इसवी सन १५०६ च्या कार्तिकी एकादशीला वयाच्या ५८ वर्षी पंढरपूरला आणली.मुख्य पांडुरंग मंदिर परिसरात इसवी सन १५१३ ला वयाच्या ६५ व्या वर्षी देह ठेवला. श्रीक्षेत्र पंढरपूर येथील मुख्य पांडुरंग रुक्मिणी मंदिरात ही पुण्यतिथी निमित्ताने भानुदास महाराज समाधीची पूजा-अर्चा सोहळा रघुनाथ महाराज पालखीवाले गोसावी यांच्या हस्ते पार पडला.

## धरणात बुडून घोड्याच्या मृत्यू--निंबायती येथील घटना

**छत्रपती संभाजीनगर ( चैताली औटे)**

शेतात जाण्यासाठी व लग्न सराईत भाड्याने देणाऱ्या शेतकऱ्यांच्या घोड्याचा शेतात जातांना पुलावरून पाय घसरून धरणात बुडून घोड्याचा मृत्यू झाल्याची घटना निंबायती शिवारातील धिंगापूर धरणात रविवारी दुपारी एक वाजता घडली आहे.




निंबायती येथील साहिल तडवी या शेतकऱ्यांचा पाळीव घोडा निंबायती शिवारात धिंगापूर धरण भागातून शेतांत पुलावरून जात असताना खचलेल्या रस्त्यात पाय फसून घोडा धरणात पडून मृत्यू झाला आहे या घोड्याची अंदाजे किंमत एक लक्ष चाळीस हजार इतकी होती दरम्यान शेतात जाण्यासाठी व येण्यासाठी शेतकरी साहिल तडवी हे घोड्याचा वापर करत होते परंतु रविवारी पुलावरून घोडा जात असताना खचलेल्या रस्त्यावर पाय फसून घोडा पुलावरून थेट धरणांत कोसळून पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे त्यामुळे शेतकऱ्यचे नुकसान झाले आहे शासनाने नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे.

## लीना गरड यांची पनवेल महानगर संघटक पदी निवड जनतेतून अभिनंदनाचा वर्षाव

**पनवेल / प्रतिनीधी**

पनवेल महानगर पालिकेच्या वतीने मालमत्ता कर आकारणी विरोधात मा. नगरसेविका लिना गरूड यांनी सत्ताधारी पक्षात असूनही प्रखर विरोध केला. जिझिया कर कमी करण्याची मागणी शेवट पर्यंत लावून धरली. मालमत्ता कर आकारणी विरोधात सिडको वसाहती मधून ठिकठिकाणी सभा, बैठक आयोजित करून लोकांची मने जिंकली आहेत, आज काही वर्षांचा मालमत्ता कर कमी करण्यात आला आहे, तो त्यांच्याच आंदोलनामुळे! पनवेल पालिकेची पथविक्रेता निवडणूक सन २०२३ ते सन २०२८ या पाच वर्षासाठी निवडणूक घोषित झाल्यानंतर नोंदणी करण्यात आलेल्या सर्व फेरीवाल्यांना मतदानाचा अधिकार का नाही या मुद्यावर मोठा वाद झाला होता, सत्ताधाऱ्यांनी सत्तेचा गैरवापर करताना आपल्याच फेरीवाल्यांना मतदानाचा अधिकार दिला होता, यावेळी बोगस फेरीवाल्यांची नोंदणी झाली होती. याला माजी नगरसेविका लीना गरड यांच्या नेतृत्त्वाखाली खारघरमध्ये प्रचंड निदर्शने करण्यात आली. मतदानाला जाण्यापूर्वी काही मिनिटे आधी ही निदर्शने केल्याने ही निवडणूक पुढे ढकलण्यात आली. त्यामुळे लीना गरड यांच्या आक्रमक भूमिकेमुळे अनेक फेरीवाल्यांना न्याय मिळाला. महानगर पालिका क्षेत्रात भरविण्यात येणारे आठवडे बाजार बंद करणे, महानगर पालिकेकडून फेरीवाल्याकडून ५० रूपये एवजी २० रूपये आकरावेत, रस्त्यावर, पदपथावर बेकायदा बसणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करणे आदी मागण्या या निदर्शनाच्या माध्यमातून लिना गरूड यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आल्या होत्या, प्रचंड आकलन शक्ती, दांडगा अभ्यास लोकसंग्रह यामुळे त्यांनी राजकीय आणि सामाजिक



क्षेत्रात गगन भरारी घेतली. पनवेल महानगर पालिकेवर भाजपची सत्ता असून भाजपने पनवेलकरांवर अवाजवी मालमत्ता कर लादला होता. सत्तेची आणि पदाची लालच न धरता मालमत्ता करा विरोधात लीना गरड यानी प्रखर विरोध केला. त्यांनी जनतेवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी त्यानी स्वखर्चातून न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. त्यामुळे त्यांना पक्षातून काढण्यात आले. जनतेला न्याय द्यायचा असेल तर शिवसेना शिवाय पर्याय नाही आणि मग लीना गरड यानी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यांनी अनेक प्रश्न घेत प्रशासनाला सलो की पळो करून सोडले आहे. असा आक्रमक रणरागिनीची उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या रायगड जिल्हा पनवेल महानगर पालिका क्षेत्रात करीता महिला महानगर संघटक पदी यांची निवड करण्यात आली. त्यामुळे त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.



वाशी प्रतिनिधी : पारगाव शहरातील तालुका वाशी जिल्हा धाराशिव पारगाव शहरातून जाणाऱ्या गिरवली रस्त्याची खूपच दयनीय अवस्था झालेली आहे व पायी चालणाऱ्यांना व टू व्हीलर चालकांना गाडी चालवता सुद्धा येईना रस्त्यावर मातीच माती व खड्डे खड्ड्यात पाणी असल्यामुळे टू व्हीलर वाहने घसरण्याची शक्यता वाढत असल्या कारणामुळे बांधकाम विभागाने याची दखल घ्यावी असे पारगाव शहरातील नागरिकांची मागणी आहे

## दिव्यात क्षत्रिय मराठा घाडीगावकर समाजाच्या वतीने गुणगौरव सोहळा. शैक्षणिक व संगीत क्षेत्रातील अनेकांचे कौतुक

ठाणे - प्रतिनिधी ठाणे, दिवा ता २१ जुलै : गुरुपौर्णिमेनिमित्त दिवा शहरात शैक्षणिक क्षेत्रात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा आणि संगीत क्षेत्रात नावलौकिक प्राप्त केलेल्या भजनी कलाकारांचा क्षत्रिय मराठा घाडीगावकर समाज दिवा शहराच्या वतीने गुणगौरव व कौतुक सोहळा रविवार २१ जुलै २०२४ रोजी दिवा शहरातील सुमित हॉल मध्ये मोठया उत्साहात व आनंदात पार पडला. क्षत्रिय मराठा घाडीगांवकर समाज दिवा शहराच्या वतीने वर्ष २०२३-२४ मध्ये प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च शिक्षण क्षेत्रात प्राविन्य व यश प्राप्त




केलेल्या विद्यार्थ्यांचा आणि संगीत क्षेत्रात नावलौकिक प्राप्त भजनी कलाकारांचा गुणगौरव श्री रामचंद्र महादेव पवार यांच्या अध्यक्षतेखाली सोहळा आयोजित करण्यात आला होता. प्रसंगी ११८ शालेय विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्ती देऊन सन्मानित करण्यात आले तसेच संगीत क्षेत्रातील मान्यवरांचाही सत्कार करण्यात आला. प्रसंगी नाना घाडीगांवकर, गोविंद घाडीगांवकर, प्रथमेश घाडीगांवकर, वसंत घाडीगांवकर, चेतन घाडीगांवकर, प्रकाश घाडीगांवकर, सदानंद घाडीगांवकर, जयवंत गांवकर, महादेव घाडीगांवकर, नारायण घाडीगांवकर यांच्यासह अनेक मान्यवर व विध्यार्थी व पालक उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077